**बार्शी येथील ५वे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, ता.बार्शी, जि. सोलापूर यांचे न्यायालयात**

**नियमित दिवाणी दावा क्र. ४५१/२०१७**

सोमनाथ नागनाथ सावंत ..... वादी

विरुध्द

उदय सिद्धेश्वर धुमाळ आणि ईतर ..... प्रतिवादी

**निशाणी क्र.५ वरील आदेश**

१. सदरचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेश ३९ नियम १ अन्वये तात्पुरती मनाई हुकुम मिळणेकरीता दाखल करण्यात आला आहे.

**दावा मिळकतीचे वर्णन -**

२. डि सोलापूर, सब डि बार्शी, तालुका बार्शी पैकी मौजे तुर्कपिंपरी, ता. बार्शी येथील मिळकत गट नं. २६०/७, क्षेत्र १हे.०६आर.,सदर मिळकतीचे चतुःसिमा खालीलप्रमाणे आहेत.

पुर्वेस – रस्ता, दक्षिणेस – प्रतिवादी यांची गट नं. २६०/८ ची जमीन, पश्चिमेस – गट नं. २५३ व उत्तरेस – गट नं. २६०/६ अशी आहे.

(सदर मिळकतीस 'दावा मिळकत' असे संबोधले जाईल.)

**वादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे–**

३. दावा मिळकत ही वादीचे मालकीची असून त्यांचे कब्जेवहिवाटीत आहे. वादीने दावा मिळकतीमध्ये लिंबोणीचे पीक घेतले आहे व दक्षिण बाजुच्या ०१एकर क्षेत्रामध्ये गहू, ज्वारी व हरबरा ईत्यादी पीके घेत आहे. दावा मिळकतीच्या दक्षिण बाजूस प्रतिवादी यांची जमीन गट नं. २६०/८अ व २६०/८ब आहे. वादी, प्रतिवादी व गट नं. २६० मधील ईतर भूधारक यांनी पूर्वी जागेची मोजणी करुन हद्दीखुणा कायम करुन घेतलेल्या आहेत व त्याप्रमाणे वादी व प्रतिवादी त्यांच्या त्यांच्या जमिनीमध्ये शांततामय कब्जे वहिवाट करीत होते. वादी पुढे असे कथन करतात की, प्रतिवादी क्र. १ व २ यांनी संगनमताने वादीच्या जमिनीमध्ये अतिक्रमण करण्याच्या उद्देशाने बांधकाम करण्याचा प्रयत्न सुरु केला. दिनांक २०/०५/२०१७ रोजी प्रतिवादीने जेसीबी आणून वादीच्या जमिनीमध्ये खड्डे खोंदण्याचा प्रयत्न केला व त्यांना अडविले असता प्रतिवादी व त्यांच्या कुटुंबियांनी दावा जमिनीमध्ये अनाधिकाराने येवून वादीस

धक्काबुक्की करुन घाणेरडया शिव्या दिल्या. सदर बाबत वादीने दिनांक २४/०५/२०१७ रोजी वैराग पोलिस ठाणे येथे लेखी तक्रार दिली. परंतु पोलिसांनी कोणतीही कार्यवाही केली नाही. प्रतिवादींच्या हरकती अशाच चालू राहिल्यास वादीला त्याचे जमिनीत उपभोग घेता येणार नाही. सबब वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीने दावा मिळकतीमध्ये वादीच्या शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये व दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करु नये अशा तात्पुरत्या अशा तुर्तातुर्त ताकिदीसाठी केला आहे.

**<u>प्रतिवादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे–</u>**

४. प्रस्तुत अर्जावरती प्रतिवादी क्र. १ व २ यांनी त्यांचे म्हणणे नि.क्र. २९ व नि.क्र. १४ अनुक्रमे दाखल केले आहेत व प्रस्तुत अर्जास हरकत नोंदविली आहे. प्रतिवादींनी असे कथन केले आहे की, वादीने दावा मिळकतीचे वर्णन चुकीचे दिलेले आहे. मौजे तुर्कपिंपरी या गावात गट नं. २६०/८ अशी कोणतीही जमीन नाही. वादीने दावा जमिनीच्या दक्षिणेस प्रतिवादी क्र. १ ची जमीन गट नं. २६०/८ब असल्याचे म्हटले आहे. परंतु गट नं. २६०/८ब च्या उता–यावर प्रतिवादी क्र. २ चे नाव दिसून येते. यावरुन वादीला त्याचे दक्षिणेस कोणाची जमीन आहे हे माहित नसल्याचे दिसून येते. प्रतिवादीने असे कथन केले आहे की, वादीची गट नं. २६०/७ या संपूर्ण जमिनीच्या ०१हे.०६आर क्षेत्रामध्ये लिंबोणीची बाग असल्याचे म्हटले आहे. दावा जमिनीचे व प्रतिवादींच्या जमिनीची केंव्हाही मोजणी झालेली नाही. प्रतिवादींनी केंव्हाही वादीच्या क्षेत्रामध्ये अतिक्रमण केले नाही व प्रतिवादींनी कोणत्याही प्रकारचे गैरकृत्य करुन वादीच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करण्याचा प्रयत्न केला नाही. सबब प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्यात यावा.

५. वादी व प्रतिवादी यांचे वादपत्राचे व दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

६. वादातील मुद्दे व त्यावरील निष्कर्ष हे त्यापुढे दर्शविल्याप्रमाणे कारणमिमांसेसह नोंदविले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | वादीस प्रथमदर्शनी केस आहे काय ? | नाही. |

| | | |
|---|---|---|
| २) | वादी हे सिध्द करतात काय की, न्यायाचा समतोल त्यांच्या बाजुने आहे ? | नाही. |
| ३) | वादी हे सिध्द करतात काय की, प्रस्तुतचा अर्ज नामंजूर केल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे ? | नाही. |
| ४) | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र.१ करिता

७. प्रस्तुत प्रकरणामध्ये वादी, प्रतिवादी क्र. १ व २ यांचे विरुद्ध तात्पुरत्या मनाई आदेशाची मागणी करीत आहे. सदर अर्ज मंजूर होण्याकरीता वादीस सदर प्रकरणामध्ये प्रथमदर्शनी केस आहे हे शाबीत करणे जरुरीचे आहे. त्याकरीता वादीस दावा मिळकतीमध्ये त्याचा हक्क आहे व प्रतिवादी क्र. १ व २ त्यास हरकत अडथळा करीत आहे ही बाब शाबीत करणे जरुरीचे आहे. वादीने प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठयर्थ नि.क्र. ४ लगत मौजे तुर्कपिंपरी, ता. बार्शी येथील जमीन गट नं. २६०/७ चा सात–बारा उतारा, मौजे तुर्कपिंपरी, ता. बार्शी येथील जमीन गट नं. २६०/८अ चा सात–बारा उतारा, मौजे तुर्कपिंपरी, ता. बार्शी येथील जमीन गट नं. २६०/८ब चा सात–बारा उतारा, मो.र.नं. ४४७५ चा 'क' आलेख नकाशाची प्रत, मोजणीदार श्री. पी.एम. सरवदे यांनी केलेल्या मोजणीचा नकाशा, वादीने, प्रतिवादीस वकिलामार्फत पाठविलेल्या नोटीसची स्थळप्रत, सदर नोटीस पाठविलेची पोष्टाची पावती, वादीने वैराग पोलिस स्टेशनला दिलेली फिर्याद ईत्यादी कागदपत्रे दाखल केली आहेत.

८. वादीचे विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, प्रस्तुत प्रकरणामध्ये वादीने प्रथमदर्शनी केस असल्याचे व न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने असल्याचे सिद्ध केले आहे. तसेच प्रस्तुतचा अर्ज नामंजूर झाल्यास वादीचे कधीही भरुन न येणारे नुकसान होईल. त्यामुळे सदर अर्ज मंजूर व्हावा असा युक्तीवाद केला. याउलट प्रतिवादीचे विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, वादीने हे सिद्ध केले नाही की, प्रतिवादी हे दावा मिळकतीमध्ये हरकत अडथळा करीत आहेत. वादीने हे दाखविले नाही की, हरकत अडथळा हे नेमके कोणते प्रतिवादी करीत आहेत. वादीने प्रथमदर्शनी केस सिद्ध केली नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर व्हावा असा युक्तीवाद

त्यांनी केला.

९. वादीचे विधींज्ञाचा युक्तीवाद व वादीने दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रतिवादीने त्याचे कथनाचे पुष्ठयर्थ कोणतीही कागदपत्रे दाखल केली नाहीत. दावा मिळकत गट क्र. २६०/७ च्या सात–बाराचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर उता–यावर भोगवटदार म्हणून वादी यांचे नाव नमूद केले आहे. नि.क्र. १४ व २९ वर असलेले प्रतिवादींचे म्हणणे याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादींनी हे म्हटले आहे की, वादीची मौजे तुर्कपिंपरी, ता. बार्शी येथील गट हनं. २६०/७ चे क्षेत्र ०१हे. ०६आर या संपूर्ण क्षेत्रामध्ये वादीची लिंबोणीची बाग आहे. यावरुन असे दिसून येते की, वादी हे दावा मिळकती मध्ये वहिवाट करीत आहेत ही बाब प्रतिवादी यांना मान्य आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणामध्ये वादीचा दावा मिळकतीमध्ये ताबा असल्याबाबत वाद उपस्थित झालेला नाही.

१०. वादीने अभिलेखावर दाखल केलेला मो.र.नं. ४४७५ 'क' आलेख नकाशाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीच्या दावा मिळकतीच्या दक्षिण बाजूस गट क्र. २६०/८/ब ही शेतजमीन आहे व जमीन गट क्र. २६०/८/ब च्या दक्षिण बाजूस गट क्र. २६०/८/अ आहे. गट क्र. २६०/८/ब या शेतजमिनीच्या सात–बारा उता–याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर जमीनीत भोगवटदार म्हणून प्रतिवादी क्र. २ यांचे नाव नमूद केलेले आहे. गट क्र. २६०/८/अ या शेतजमिनीच्या सात–बारा उता–याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर जमीनीत भोगवटदार म्हणून प्रतिवादी क्र. १ यांचे नाव नमूद केलेले आहे.

११. वादीने प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठयर्थ शपथपत्र नि.क्र. ६ वर दाखल केले आहे व त्यामध्ये अर्जातील कथनांची पुनरावृत्ती केली आहे. सदर शपथपत्रामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, प्रतिवादी क्र. १ व २ त्यांच्या दावा मिळकतीच्या शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करीत आहेत. वादीने अर्जामध्ये केलेले कथन की, प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करण्याच्या उद्देशाने पूर्व बाजूकडून उत्तरेस बांधकाम करण्याच्या उद्देशाने खडी, वाळू व बांधकामाचे ईतर साहित्य आणून टाकले. दिनांक २०/०५/२०१७ रोजी प्रतिवादी क्र. १ व २ यांनी जेसीबी मशिन आणून दावा मिळकतीमध्ये खड्डे खांदण्याचा प्रयत्न केला. वादींनी त्यांना आडवले असता त्यांनी वादीला मारहाण व शिवीगाळ केली. सदर बाबत वादीने प्रतिवादी यांच्या विरुद्ध वैराग पोलिस स्टेशन येथे दिनांक २३/०५/२०१७ रोजी

तक्रारी अर्ज दाखल केला. सदर तक्रारी अर्जाची स्थळप्रत वादीने अभिलेखावर दाखल केली आहे. तसेच वादीने प्रतिवादी यांना दिनांक २४/०५/२०१७ रोजी त्यांचे विधीज्ञांमार्फत नोटीस पाठवून वादीचे दावा मिळकतीतील शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा होईल असे कृत्य न करण्याची विनंती केली. सदर नोटीसची स्थळप्रत व पोहोच पावती वादीने अभिलेखावर दाखल केली आहे. सदर तक्रारी अर्जाची व नोटीसचे अवलोकनावरुन व तारखांचा अनुक्रम लक्षात घेता असे दिसून येते की, सदर अर्जामध्ये व नोटीसीमध्ये लिहीलेला मजकूर व प्रस्तुत अर्जातील मजकुर सारखा आहे.

१२. यासर्व कागदपत्रांवरुन वादी हे दावा मिळकतीच्या कब्जेवहिवाटीत असल्याचे वादी प्रथमदर्शनी सिद्ध करतात. परंतु दावा जमिनीमध्ये होत असलेल्या अतिक्रमणाबाबत वादीने प्रतिवादीस पाठविलेली नोटीस, तक्रारी अर्ज, प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठयर्थ दाखल केलेले शपथपत्र या सर्वांमधील अभिकथना व्यतिरिक्त ईतर कोणताही पुरावा वादीने समोर आणला नाही. वादीचे असे म्हणणे नाही की, प्रतिवादीने दावा जमिनीमध्ये हद्दीखुणांचे रोवलेले दगड काढून टाकण्याचा प्रयत्न केला आहे. बांधकामाकरीता प्रतिवादींनी आणून टाकलेले साहित्य हे त्यांनी दावा जमिनीमध्ये टाकले नसून प्रतिवादीच्या स्वतःच्या जमिनीमध्ये टाकल्याचे म्हटले आहे. जेसीबीने प्रतिवादींनी दावा जमिनीमध्ये खड्डा खांदण्याचा प्रयत्न केला हे दाखविण्याकरीता तोंडी आरोपा व्यतिरिक्त वादीने ईतर कोणतेही पुरावे दाखल केले नाहीत. प्रस्तुत प्रकरणामध्ये वादीने त्याच्या म्हणण्याच्या पुष्ठयर्थ कोणतेही छायाचित्रे दाखल केली नाहीत. प्रस्तुत अर्ज दाखल केल्यापासून आजतगायत प्रतिवादीचे दावा जमिनीत हरकत अडथळा करण्याचे कृत्य चालू आहे किंवा कसे हे दाखविण्यासाठी वादीने अभिलेखावर काही आणले नाही अथवा तोंडी युक्तीवादामध्ये, प्रतिवादी अजूनही हरकत अडथळा करीत आहेत असे म्हटले नाही. या सर्वांवरुन वादी हा दावा मिळकतीच्या कब्जेवहिवाटीत आहे हे दिसून येत असले तरीही प्रतिवादी हे दावा मिळकतीमध्ये हरकत अडथळा करीत आहे ही बाब प्रथमदर्शनी दिसून येत नाही. त्यामुळे सदर परिस्थितीमध्ये वादीस त्याचे बाजूने प्रथमदर्शनी केस असल्याचे आढळून येत नाही. त्यामुळे मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष मी नकारार्थी नोंदवत आहे.

<u>**मुद्दा क्र.२ व ३ करिता–**</u>

१३. वादीचे विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, वादी दावा मिळकतीचा मालक व वहिवाटदार असून प्रतिवादी हे त्यास हरकत अडथळा करीत आहेत. त्यामुळे वादीचे कायदेशीर हक्कांवर गदा येवून वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होत आहे. या अनुषंगाने हे नमूद

करणे जरुरीचे की, वादीने त्यास प्रथमदर्शनी केस आहे ही बाब दर्शविली नाही. तसेच सद्यस्थितीत अभिलेखावरुन दावा मिळकत वादीचे कब्जेवहिवाटीत आहे असे दिसून येते. अशा परिस्थितीत निश्चितच प्रतिवादी यांनी वादीचे दावा मिळकतीतील कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा निर्माण केलयास वादीच्या हक्कांचे उल्लंघन होणार असून वादीस दावा मिळकतीमध्ये शांततापूर्वक वहिवाट करता येणार नाही. परंतु वादी हे सिद्ध करु शकले नाही की, प्रतिवादी हे दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करुन वादीच्या शांततामय वहिवाटीस हरकत अडथळा करीत आहेत. अशा परिस्थितीत न्यायाचा तराजू वादीच्या बाजूने झुकत आहे किंवा नाही आणि वादीस अपरिमित नुकसान होणार आहे हे वादी सिद्ध करु शकलेले नाहीत. सद्यस्थितीला वादीने मनाई आदेश पारित न केल्यास त्याचे कधीही भरुन न येणारे नुकसान होणार असून न्यायाचा तराजू त्याचे बाजूने झुकत आहे ही बाब सिद्ध केली नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र.२ व ३ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ करिताः</u>**

१४. वरील सर्व परिस्थिती व बाबी, तसेच मुद्दयांवरील निष्कर्ष व त्यावरील कारणमिमांसा व दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ३९ मधील तरतुदी ध्यानात घेता प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. त्याप्रमाणे मुद्दा क्र.४ च्या उत्तरार्थी खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १ | वादीचा अर्ज नि.क्र.५ तात्पुरत्या मनाईचा अर्ज नामंजूर करण्यात आला. |
| २ | पक्षकारांनी आपआपले खर्च सोसावेत. |

(खुल्या न्यायालयात अधिघोषित)

सही/–

(श्रीमती रेवती पी. बागडे )

दिनांक २६/०६/२०२५ ५वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बार्शी.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | S.V. Kokate (Grade III) |
| (b) | Court | : | Smt. R.P. Bagade<br>4th Jt. Civil Judge,<br>J.D.& J.M.F.C. Barshi |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 26/06/2025 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 30/06/2025. |